नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२०२१

आदेश निशाणी क्र. ५ व ७ वर

1. वादीचा दावा हा गट क्र.१०३/१ क्षेत्र ८१आर. चे वादी कायदेशीर मालक व वहिवाटदार आहेत अशा जाहीर ठरावासाठी व गट क्र.१०३/२ब/२ब/२ बाबतच्या अकृषीक परवानगीच्या आधारे दावा मिळकतीची विक्री अथवा तबदीली करु नये अशा मनाई हुकूमासाठी केला आहे व या अर्जाने वादीने तशाच स्वरुपाच्या तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

2. वादीचे कथन असे आहे की, महाराष्ट्र शासनाने ६हे. ९१आर. क्षेत्र पुर्नवसनासाठी भागवत गवळी अ.पा.क. बाळकृष्ण नाईक गवळी यांचेकडून धरणग्रस्तांना वाटप करण्यासाठी संपादीत केले आहे. त्यापैकी ०हे. ८१आर. ही जमीन मारुती लक्ष्मण देशमुख याला जिल्हाधिकारी यांच्या ३१.०३.१९८९ च्या आदेशाने मिळाली आहे. त्याबद्दलचा फेरफार नं.४९४८ असा आहे. तो गट क्र. १०३/१ आहे. शामराव बापुराव देशमुख याला २हे. २ आर. ही जमीन फेरफार क्र.४९५३ ने मिळाली आहे. त्याचा गट क्र. १०३/१/अ आहे. पांडुरंग देशमुखला ८१आर. फेरफार ४९५५ ने मिळाली आहे त्याचा गट क्र. १०३/२ब/२अ असा आहे. लक्ष्मीबाई देशमुख हिला १हे. २१आर. ही जमीन फेरफार ४९५४ ने आली आहे. तिचा गट क्र. १०३/२ब/१ असा आहे. तसेच वामन, विठ्ठल, नामदेव देशमुख यांना २हे. २आर. क्षेत्र देण्यात आले त्याचा फेरफार क्र.८२५५ आहे व गट क्र.१०३/२ब/२ब/१/१ असा आहे. उर्वरित ०हे. ४आर. क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उप संचालक पुर्नवसन यांचे ७/१२ पत्रकी दिसून येते. त्याचा गट क्र.१०३/२ब/२ब/१/२ असा आहे. अशा प्रकारे पुर्नवसनासाठी संपादीत झालेले एकूण क्षेत्र ६हे. ९१आर. चे वाटप करण्यात आलेले आहे. सदर संपादीत सर्व्हे क्र.६२/२ म्हणजे गट क्र.१०३ क्षेत्र ६हे. ९१आर. चे वाटप करतेवेळी पुढील प्रमाणे गट विभाजन होत गेले. प्रथमतः प्रतिवादी क्र.११ मारुती देशमुख यांना गट क्र.१०३ मधून ०हे. ८१आर. चे वाटप केले त्याचा गट क्र. १०३/१ उर्वरित ६हे . १०आर. याचा गट क्र.१०३/२ असा देण्यात आला. त्याचा फेरफार क्र.८९४८ दि.१४/०५/१९९० रोजीचा ती नोंद दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित झाली.

त्यानंतर गट क्र.१०३/२ मधील क्षेत्र ६हे.१०आर. पैकी शामराव बापूराव देशमुख यांना २ हे. ०२आर. जमीनीचे वाटप केले त्यामुळे गट क्र.१०३/२ चे विभाजन होवून शामराव देशमुख यांचे जमीनीस गट क्र.१०३/२/अ व उर्वरित क्षेत्र ४हे. ०८आर. यास गट क्र.१०३/२/ब असा गट नंबर देण्यात आला. शामराव देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार नं.४९५३ अन्वये दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित झाली. त्यानंतर गट नं.१०३/२ब चे क्षेत्र ०४ हे. ०८ आर. पैकी लक्ष्मी लक्ष्मण देशमुख यांना .हे. २१ आर. जमीनीचे वाटप करणेत आले त्यामुळे त्यांचे जमीनीस गट क्र.१०३/२ब/१ असा देणेत आला व उर्वरित क्षेत्र २हे. ८७आर. यास गट नं.१०३/२ब/२ असा देणेत आला. लक्ष्मी देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद फेरफार नं.४९५४ अन्वये तारीख दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित झाली. त्यानंतर गट नं१०३/२ब/२ मधील क्षेत्र २ हे. ८७ आर पैकी पांडूरंग महादेव देशमुख यांना ००हे. ८१आर. जमीनीचे वाटप केले त्यामुळे गट नं.१०३/२ब/२ चे विभाजन होवून पांडूरंग देशमुख यांचे जमीनीस गट क्र.१०३/२ब/२अ व उर्वरित क्षेत्र २हे. ०६ आर. यास १०३/२ब/२ब असा नंबर देणेत आला. पांडुरंग देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार नं.४९५५ अन्वये दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित करण्यात आली. त्यानंतर गट नं.१०३/२ब/२ब असा नंबर देणेत आला. पांडुरंग देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार क्र.४९५५ अन्वये दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित करण्यात आली. त्यानंतर गट नं.१०३/२ब/२ब क्षेत्र ०२हे. ०६आर. पैकी ०२हे. ०२आर. इतके क्षेत्र वामन, विठ्ठल, नामदेव, महादेव देशमुख यांना जमीनीचे वाटप केले त्यामुळे १०३/२ब/२ब चे विभाजन होवून वामन, विठ्ठल, नामदेव महादेव देशमुख यांचे जमीनीस गट क्र.१०३/२ब/२ब/१/१ व उर्वरित क्षेत्र ००हे. ०४आर. यास गट नं.१०३/२ब/२ब/१/२ असा देण्यात आला. वामन, विठ्ठल, नामदेव महादेव देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार नं.८२५५ अन्वये प्रमाणित झालेली आहे. सदर गट नं.१०३/२ब/२ब/१/२ क्षेत्र ०० हे. ०४आर. एवढे क्षेत्र मा. जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन जमीन सोलापूर यांचे नावे आज पावेतो शिल्लक आहे. वरील वाटपाप्रमाणे जमीन मालकास कब्जे पावती करुन जमीनीचा प्रत्यक्ष ताबा त्याचवेळी देण्यात आला होता. तसेच सदरचे वाटपाप्रमाणे गट नंबर १०३ चे वरिलप्रमाणे पोटहिस्याचे नवीन ७/१२ उतारे सन १९९०-९१ मध्ये तयार झालेले आहेत.

3. अशाप्रकारे १०३ चे विभाजन झाले असताना प्रतिवादी क्र.११ यांनी महसूल अधिका-यांना हाताशी धरुन फेरफार नं. ४९४८ व ४९५४ मध्ये गट नंबर व त्यावरील क्षेत्र तसेच आकार मध्ये खाडाखोड करुन १९९६-१९९७ सालामध्ये फेरफार नं.४९४८ दर्शविलेल्या गट क्र.१०३/१ ऐवजी खाडाखोड करुन गट क्र. १०३/२ब/२ब/२ असा लिहला व त्याचे क्षेत्र ८१आर. एवढेच ठेवण्यात आले, तसेचफेरफार नं.४९४८ मध्ये गट क्र.१०३/२ ऐवजी गट क्र.१०३/२ब/२ब/१ अशी खाडाखोडीने नोंद करुन त्याचे मुळ क्षेत्र ६हे. १०आर. ऐवजी १हे. २५ आर. असे केले. अशा पोकळ बेकायदेशीर नोंदीच्या आधारे गट क्र.१०३/२ब/२ब/२ चा ७/१२ उतारा १९९६-९७ सालामाध्ये प्रतिवादी क्र.११ चे नावे अस्तीत्वात आणलेला आहे. वास्तवीक पुर्नवसन खात्याने प्रतिवादी क्र.११ ला ०हे. ८१आर. चे वाटप १९८९ मध्ये केलेले असताना व त्यास गट क्र.१०३/१ असा दिलेला असताना गट क्र.१०३/२ब/२ब/२ चे कोणतेही वाटप झालेले नसताना अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राचा ७/१२ उतारा तयार करुन त्याचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादी क्र. ११ यांनी अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राचे बेकायदेशीररीत्या प्रतिवादी क्र.१२ च्या नावे साठेखत करुन दिलेले आहे. अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राच्या ७/१२ उता-याच्या आधारावर प्रतिवादी क्र.३ यांची दिशाभूल करुन बेकायदेशीर परवानगीच्या आधारे गट क्र.१०३/२ क्षेत्र ८१ आर. प्रतिवादी क्र.१२ ने प्रतिवादी क्र.११ कडून खरेदी केलेले आहे. परंतु, प्रत्यक्ष ताबा अगर मालकी प्राप्त झालेली नव्हती व नाही. त्यानंतर प्रतिवादी क्र.१२ ने प्रतिवादी क्र.१३ ला मिळकत विक्री केली असली तरी मुळात प्रतिवादी क्र.११ व १२ अगर प्रतिवादी क्र.१ यांना कोणताही मालकी हक्क मिळालेला नसल्यामुळे संपूर्ण व्यवहार मुळातच बेकायदेशीर आहे. म्हणून वादीचा प्रस्तुतचा दावा व अर्ज आहे.

4. प्रतिवादी क्र.१ ने निशाणी क्र.१४ वर आपले म्हणणे देऊन वादीच्या तात्पुरत्या मनाई हुकमांच्या अर्जांना हरकत नोंदविली. त्याचे म्हणणे असे आहे की, वादीने रे.मु.क्र.५९१/२०१७ हा दाखल केलेला असून पुन्हा त्याच पक्षकारांना सामील करुन दुसरा दावा केलेला आहे. त्यामुळे त्याला रेस ज्युडीकेटा या तत्वाची बाधा येत आहे. मौजे. कासेगांव ता पंढरपूर येथील गट क्र.१६५/२ मधील मुळ क्षेत्र ६हे. ९१आर.

पैकी ०हे. ८१आर. ही जमीन मुळ धरणग्रस्त शेतकरी मारुती लक्ष्मण देशमुख यांना १९८९ साली मिळाली. फेरफार क्र. ४९४८ नुसार तिला ०६/०६/१९९० रोजी त्याला गट क्र.१०३/२ब/२ब/२ हा देण्यात आला. त्यांनी ती जमीन प्रतिवादी क्र. १२ ला विक्री केली व प्रतिवादी क्र.१२ ने या प्रतिवादीला विकली. प्रतिवादी क्र. १ पुढे सांगतो की, त्याने ही जमीन दि.२३/१०/२००८ रोजी ही जमीन खरेदीखताने खरेदी केलेली आहे त्यामुळे वादीला दि.२१/०५/२०१२ रोजीच्या खरेदीखताने कोणताही मालकी हक्क अथवा ताबा मिळालेला नाही. या पूर्वी वादीने रे.मु.क्र.११/२०१३ हा दाखल करुन न्यायालयाची दिशाभूल करुन तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश घेतला होता. तरीही प्रतिवादी क्र. १ चे नुकसान व्हावे व दिर्घकालीन दावा प्रलंबित रहावा म्हणून हा दावा केलेला आहे तो नामंजूर होवून मिळण्याची विनंती केलेली आहे.

5. सदर अर्जाचे निर्णयाचे मुददे व त्यांचे निष्कर्षासाठी खालीलप्रमाणे.

| मु ददे | | नि ष्क र्ष |
|---|---|---|
| 1. वादीच्या लाभात प्रथमदर्शनी पुरावा आहे का ? | ... | आहे |
| 2. न्यायाचा समतोल वादीच्या लाभात आहे काय ? | ... | आहे |
| 3. तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान संभवते काय ? | ... | आहे |
| 4. आदेश काय ? | ... | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

<u>का र ण मि मां सा</u>

<u>मुददे क्र. १ ते ४ बाबत</u> **:-**

6. वादीने तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या पृष्ठयर्थ खालील कागदपत्रांचा आधार घेतला.

1. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील गट नं.१०३/१ चा ७/१२ उतारा.
2. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील सर्व्हे नं.६२ चा ७/१२ उतारा.
3. जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुर्नवसन (जमिन) सोलापूर यांचे कार्यालयातील

क्र.पुनर्वसन/३/आर.आर./६१४/८९ दिनांक ३१/०३/१९८९ साक्षांकित प्रत.

4. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील प्रतिवादी क्र.११ यांस प्रदान करणेत आलेल्या जमिनीचे परिशिष्ठ साक्षांकित प्रत.
5. चलन साक्षांकित प्रत.
6. प्रतिवादी क्र.११ यास महाराष्ट्र शासन यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या गट नं.१०३/1 क्षेत्र ००हे. ८१आर. ची कब्जे पावती साक्षांकित प्रत.
7. प्रतिवादी क्र.११ यास महाराष्ट्र शासन यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या गट नं.१०३/१ क्षेत्र ००हे. ८१आर. ची कब्जा देतेवेळी केलेला पंचनामा साक्षांकित प्रत.
8. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील गट नं.१०३/२ब/२ब/१/२ चा ७/१२ उतारा.
9. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.४९४८.
10. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.४९५३.
11. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.४९५४.
12. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.४९५५.
13. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.१७२७०.
14. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.१७२८९.
15. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.१७७८६.
16. प्रतिवादी क्र. १ यांनी तथाकथित बेकायदेशीर ७/१२ चे अधारे अकृषिक परवानगीसाठी केलेला अर्ज व त्यावरील आदेश.
17. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.४९४८ ची कलर झेरॉक्स.
18. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर येथील फेरफार नं.४९५४ ची कलर झेरॉक्स.
19. मा. सर्वोच्च न्यायालय यांचे कडिल स्पेशल लिव्ह पिटीशन ७०६४/२०२१ मधील दि.३०/०९/२०२१ रोजीचे आदेशाची साक्षांकित प्रत.
20. आर.सी.एस.क्र.११/२०१३ नि.क्र. ८ वरील आदेश.
21. गट क्र.१०३ च्या विभाजनाबद्दलचा कच्चा नकाशा.
22. आर.सी.एस.क्र.११/२०१३ मधील नि.क्र. ५ चा अर्ज व त्यावरील आदेश.
23. दिवाणी किरकोळ अपील क्र.८७/२०१४ मधील आदेश.

7. प्रतिवादी क्र. १ च्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ खालील कागदपत्रांचा आधार घेतला.

1. स्पे.लिव्ह. पिटीशन क्र.७०६४/२०२१ मधील वेगवेगळया तारखांचे अंतरिम आदेश.
2. प्रतिवादी क्र.११ व १२ मधील नोंदणीकृत साठेखत प्रत.
3. प्रतिवादी क्र.११ व १२ मधील नोंदणीकृत खरेदीखत प्रत.
4. प्रतिवादी क्र.१४ यांनी उप जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेले दि.१६/११/२०१७ चे पत्र फेरफार क्र.१६०७९.
5. बिनशेती आदेशाबद्दलचा फेरफार क्र.१६०७९, १७२४० ची नक्कल.
6. प्रतिवादींनीदेखील पुर्वीच्या आर.सी.एस.क्र११/२०१३ मधील आदेशाच्या नकला दाखल केलेल्या आहेत.
7. आर.सी.एस.क्र११/२०१३ मधील यादीमध्ये नंदकुमार गेंड याने वादीची नोंद होवू नये म्हणून दिलेला तक्रार अर्ज व त्या अर्जावरुन काढलेली महसूल खात्याची नोटीस.
8. वादीने मंडल अधिकारी यांचे समोर दिलेला जबाब त्यांनी महसूल खात्याकडे दिलेले तक्रारी अर्ज.
9. मंडल अधिकारी यांचे समोर दिलेला वादीचा, शहाजी बाबर व नंदकुमार गेंड यांचे जबाब.
10. मंडल अधिकारी यांचा फेरफार क्र.१७७८६ ही खरेदीची नोंद प्रमाणित करण्याबद्दलचा आदेश.
11. फेरफार नं.५६१९.
12. उप अधिक्षक भूमी अभिलेख यांनी सरकारी वकीलांना पाठविलेले पत्र.
13. भू अभिलेख यांनी दिलेल्या कैफियतची सही शिक्याची नक्कल.
14. मुळ मालक मारुती देशमुख यांनी जमीनीची विक्री परवानगीबाबतचा दिलेला अर्ज.
15. तहसीलदार पंढरपूर यांना उप जिल्हाधिकारी पुर्नवसन यांनी दुबार झालेल्या बेकायदेशीर खरेदीखत रद्द झालेल्या बाबतचे पत्र.

**8.** तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे एकत्रीत चर्चेसाठी घेतले आहेत. वादीचे म्हणणे असे आहे की, मुळात मारुती देशमुख यांना गट क्र. १०३/२ब/२ चा मालकी हक्क व ताबा नसल्यामुळे कागदोपत्री खरेदीदार बजरंग बागल आणि प्रतिवादी क्र. १३ गणेश चव्हाण अगर प्रतिवादी क्र.१ रंजन डोंबे यांना कायदयाने कोणताही मालकी हक्क मिळालेला नाही. गट क्र. १०३/२ब/२ हा मुळतः अस्तीत्वात आलेला गट नंबर नव्हता व नाही त्यामुळे त्या अनुषंगाने झालेले व्यवहार हे बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र. १ हा बेकायदेशीररित्या अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राच्या ७/१२ उता-याच्या आधारे वादीच्या मालकी व ताब्यात असलेल्या दावा मिळकतीचे प्लॉट पाडून विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहेत. वादीने दाखल केलेल्या गट क्र.१०३ च्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता तो वादीच्या नावे असल्याचे दिसते. ती मिळकत वादीने खरेदी घेतली आहे. सर्व्हे नं.६२, गट क्र.१०३ क्षेत्र. ७ हे. ७१आर. पैकी ६हे. ९१आर. क्षेत्र हे महाराष्ट्र शासनाने पुर्नवसनासाठी भागवत बाळकृष्ण गवळी अ.पा.क. बाळकृष्ण नाईक यांचेकडून संपादीत केलेली आहे. त्याबाबत फेरफार नं. ९००९ नुसार विभाजन होवून सर्व्हे नं.६२ चे सर्व्हे क्र.६२/१ ०हे. ८१आर. हे क्षेत्र मुळ मालक भागवत बाळकृष्ण गवळी अ.पा.क. बाळकृष्ण नाईक यांचे नावे ठेवण्यात आले व महाराष्ट्र शासनाने संपादीत केलेल्या क्षेत्रास सर्व्हे क्र.६२/२ देण्यात आला. सदरची नोंद ही दि.२१/०९/१९७४ रोजी प्रमाणित झालेली आहे. सर्व्हे क्र.६२/२ ही जमीन शासनाने धरणग्रस्तासाठी वाटप करण्यासाठी संपादीत केलेली होती. एकत्रीकरण योजनेमध्ये सर्व्हे नं.६२/२ यास गट क्र.१०३ देण्यात आलेला आहे. या संपादीत क्षेत्रापैकी ०हे. ८१आर. प्रतिवादी क्र.११ यांना जिल्हाधिकारी तथा उप संचालक पुर्नवसन यांच्या दि.३१/०३/१९८९ रोजीच्या आदेशाने देण्यात आली. त्याचा फेरफार क्र.४९४८ असून गट क्र.१०३/१ असा आहे. तसेच १९८९-९० मध्ये शामराव बापुराव देशमुख यांना २हे. २आर. क्षेत्र वाटप झाले त्याचा फेरफार क्र. ४९५३ असून गट क्र.१०३/२ आहे. त्याचप्रमाणे पांडुरंग देशमुख यांनी ८१आर. क्षेत्र वाटप झाले त्याचा फेरफार क्र.४९५५ असून गट क्र.१०३/२/२अ असा आहे. लक्ष्मीबाई देशमुख यांना १हे. २१आर. क्षेत्र देण्यात आले. त्याचा फेरफार क्र.४९५४ आहे व गट क्र.१०३/२ब/१ असा आहे. तसेच वामन, विठ्ठल, नामदेव देशमुख यांना २हे. २आर. क्षेत्र देण्यात आले त्याचा फेरफार क्र.८२५५ आहे व गट

क्र.१०३/२ब/२ब/१/१ असा आहे. उर्वरित ०हे. ४आर. क्षेत्र जिल्हाधिकारी तथा उप संचालक पुर्नवसन यांचे ७/१२ पत्रकी दिसून येते. त्याचा गट क्र.१०३/२ब/२ब/१/२ असा आहे. अशाप्रकारे पुर्नवसनासाठी संपादीत झालेले एकूण क्षेत्र ६हे. ९१आर. चे वाटप करण्यात आलेले आहे. सदर संपादीत सर्व्हे क्र.६२/२ म्हणजे गट क्र.१०३ क्षेत्र ६हे. ९१आर. चे वाटप करतेवेळी पुढील प्रमाणे गट विभाजन होत गेले. प्रथमतः प्रतिवादी क्र.११ मारुती देशमुख यांना गट क्र.१०३ मधून ०हे. ८१आर. चे वाटप केले त्याचा गट क्र. १०३/१ उर्वरित ६हे . १०आर. याचा गट क्र.१०३/२ असा देण्यात आला. त्याचा फेरफार क्र.८९४८ दि.१४/०५/१९९० रोजीचा ती नोंद दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित झाली. त्यानंतर गट क्र.१०३/२ मधील क्षेत्र ६हे.१०आर. पैकी शामराव बापूराव देशमुख यांना २ हे. ०२ आर. जमीनीचे वाटप केले त्यामुळे गट क्र.१०३/२ चे विभाजन होवून शामराव देशमुख यांचे जमीनीस गट क्र.१०३/२/अ व उर्वरित क्षेत्र ४हे. ०८आर. यास गट क्र.१०३/२/ब असा गट नंबर देण्यात आला. शामराव देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार नं.४९५३ अन्वये दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित झाली. त्यानंतर गट नं.१०३/२ब चे क्षेत्र ०४ हे. ०८ आर. पैकी लक्ष्मी लक्ष्मण देशमुख यांना .हे. २१ आर. जमीनीचे वाटप करणेत आले त्यामुळे त्यांचे जमीनीस गट क्र.१०३/२ब/१ असा देणेत आला व उर्वरित क्षेत्र २हे. ८७ र. यास गट नं.१०३/२ब/२ असा देणेत आला. लक्ष्मी देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद फेरफार नं.४९५४ अन्वये तारीख दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित झाली. त्यानंतर गट नं१०३/२ब/२ मधील क्षेत्र २ हे. ८७ आर पैकी पांडूरंग महादेव देशमुख यांना ००हे. ८१आर. जमीनीचे वाटप केले त्यामुळे गट नं.१०३/२ब/२ चे विभाजन होवून पांडूरंग देशमुख यांचे जमीनीस गट क्र.१०३/२ब/२अ व उर्वरित क्षेत्र २हे. ०६ आर. यास १०३/२ब/२ब असा नंबर देणेत आला. पांडुरंग देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार नं.४९५५ अन्वये दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित करण्यात आली. त्यानंतर गट नं.१०३/२ब/२ब असा नंबर देणेत आला. पांडुरंग देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार क्र.४९५५ अन्वये दि.०६/०६/१९९० रोजी प्रमाणित करण्यात आली. त्यानंतर गट नं.१०३/२ब/२ब क्षेत्र ०२हे. ०६आर. पैकी ०२हे. ०२आर. इतके क्षेत्र वामन, विठ्ठल, नामदेव, महादेव देशमुख यांना जमीनीचे वाटप केले त्यामुळे १०३/२ब/२ब चे विभाजन होवून वामन,

विठ्ठल, नामदेव महादेव देशमुख यांचे जमीनीस गट क्र.१०३/२ब/२ब/१/1 व उर्वरित क्षेत्र ००हे. ०४आर. यास गट नं.१०३/२ब/२ब/१/२ असा देण्यात आला. वामन, विठ्ठल, नामदेव महादेव देशमुख यांना दिलेल्या जमिनीची नोंद ही फेरफार नं.८२५५ अन्वये प्रमाणित झालेली आहे. सदर गट नं.१०३/२ब/२ब/१/२ क्षेत्र ०० हे. ०४आर. एवढे क्षेत्र मा. जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन जमीन सोलापूर यांचे नावे आज पावेतो शिल्लक आहे. वरील वाटपाप्रमाणे जमीन मालकास कब्जे पावती करुन जमीनीचा प्रत्यक्ष ताबा त्याचवेळी देण्यात आला होता. तसेच सदरचे वाटपाप्रमाणे गट नंबर १०३ चे वरिलप्रमाणे पोटहिस्याचे नवीन ७/१२ उतारे सन १९९०-९१ मध्ये तयार झालेले आहेत. वादीने दाखल केलेले फेरफार व कागदपत्रांवरुन या स्थितीला त्याच्या म्हणण्यात तथ्य आढळून येते.

9. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, वरीलप्रमाणे गट क्र. १०३ चे विभाजन झाले असताना प्रतिवादी क्र.११ यांनी महसूल अधिका-यांना हाताशी धरुन फेरफार नं. ४९४८ व ४९५४ मध्ये गट नंबर व त्यावरील क्षेत्र तसेच आकार मध्ये खाडाखोड करुन १९९६-१९९७ सालामध्ये फेरफार नं.४९४८ दर्शविलेल्या गट क्र.१०३/१ ऐवजी खाडाखोड करुन गट क्र. १०३/२ब/२ब/२ असा लिहला व त्याचे क्षेत्र ८१आर. एवढेच ठेवण्यात आले, तसेच फेरफार नं.४९४८ मध्ये गट क्र.१०३/२ ऐवजी गट क्र.१०३/२ब/२ब/१ अशी खाडाखोडीने नोंद करुन त्याचे मुळ क्षेत्र ६हे. १०आर. ऐवजी १हे. २५ आर. असे केले. अशा पोकळ बेकायदेशीर नोंदीच्या आधारे गट क्र.१०३/२ब/२ब/२ चा ७/१२ उतारा १९९६-९७ सालामाध्ये प्रतिवादी क्र.११ चे नावे अस्तीत्वात आणलेला आहे. वास्तवीक पुर्नवसन खात्याने प्रतिवादी क्र.११ ला ०हे. ८१आर. चे वाटप १९८९ मध्ये केलेले असताना व त्यास गट क्र.१०३/१ असा दिलेला असताना गट क्र.१०३/२ब/२ब/२ चे कोणतेही वाटप झालेले नसताना अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राचा ७/१२ उतारा तयार करुन त्याचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादी क्र. ११ यांनी अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राचे बेकायदेशीररीत्या प्रतिवादी क्र. १२ च्या नावे साठेखत करुन दिलेले आहे. अस्तीत्वात नसलेल्या क्षेत्राच्या ७/१२ उता-याच्या आधारावर प्रतिवादी क्र.३ यांची दिशाभूल करुन बेकायदेशीर परवानगीच्या आधारे गट क्र.१०३/२ क्षेत्र ८१

आर. प्रतिवादी क्र.१२ ने प्रतिवादी क्र.११ कडून खरेदी केलेले आहे. परंतु, प्रत्यक्ष ताबा अगर मालकी प्राप्त झालेली नव्हती व नाही. त्यानंतर प्रतिवादी क्र.१२ ने प्रतिवादी क्र.१३ ला मिळकत विक्री केली असली तरी मुळात प्रतिवादी क्र.११ व १२ अगर प्रतिवादी क्र.१ यांना कोणताही मालकी हक्क मिळालेला नसल्यामुळे संपूर्ण व्यवहार मुळातच बेकायदेशीर आहे.

**10.** प्रतिवादी दाखल केलेला फेरफार नं.१६०७९ हिने गट क्र. १०३/२ब/२ब/२ क्षेत्र ८१आर. चे निवासी प्रयोजनासाठी बिनशेती वापरण्यास परवानगी देण्यात आली असल्याचे दिसत असले तरीही मुळात गट क्र.१०३/२ब/२ब/२ च्या वरील क्षेत्रासंदर्भात असलेल्या फेरफार नं. ४९४८ मध्ये खाडाखोड असल्याने त्याच्या प्रत्यक्ष क्षेत्राच्या अस्तीत्वाबद्दल संशय निर्माण होतो.

**11.** प्रतिवादी तर्फे खालील न्यायनिवाडयांचा आधार घेण्यात आला.

1. मुखत्तार खान अक्रम खान विरुध्द अब्दुल तालीब अब्दुल वाहीद, २०१५(६) एम.एच.एल.जे पान नं.९३१.
2. अजय मित्तल इंडस्ट्रीज प्रिमायसेस को-ऑपरेटीव्ह सोसायटी विरुध्द राज पब्लीसीटी २००४(४) एम.एच.एल.जे पान नं.३०५.
3. शोभा डेव्हलपर्स लि., विरुध्द लंका सिताराम कामाटी,२०१४(३)एम.एच.एल.जे पान नं.४४५
4. सीमा अर्शिद जहीर विरुध्द म्युनीसिपल कॉर्पोरेशन ऑफ मुंबई,२००६(५)एम.एच.एल.जे पान नं.२१८.
5. बबन मेंघारे विरुध्द मधुकर मेंघारे २००७(१)एम.एच.एल.जे पान नं.३०६.
6. चंद्रकांत सपकाळ विरुध्द अनिल खटावकर २००२(४)एम.एच.एल.जे पान नं.८८९.
7. नगरपरिषद कातोळ विरुध्द कॉटन मार्केट धर्मशाळा ट्रस्ट २०२०(१)एम.एच.एल.जे पान नं.९४२.

दाखल केलेल्या न्यायनिवाडयातील परिस्थती ही हाती असलेल्या प्रकरणाशी सुसंगत नसून वेगळी आहे.त्यामुळे त्यातील निष्कर्षांचा या प्रकरणात

प्रतिवादीच्या लाभात उपयोग करता येत नाही. हाती असलेल्या प्रकरणामध्ये वादीनेच प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला असल्याचे दिसते. त्यामुळे न्यायाचा समतोलही त्याच्याच लाभात आढळून येतो म्हणूनच अर्ज नामंजूर झाल्यास त्याचेच नुकसान संभवते.

**12.** दोन्ही बाजूंनी अभिलेखावर दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे समजते की, जि. सोलापूर पैकी ता. पंढरपूर, मौजे कासेगाव येथील गट क्र.१०३ म्हणजे सर्व्हे क्र. ६२/२ चे क्षेत्र ६हे. ९१आर. होते. त्यापैकी ८१आर. इतके क्षेत्र मारुती लक्ष्मण देशमुख याला दि.३१/०३/१९८९ रोजी फेरफार क्र. ४९४८ अन्वये मिळाले तो गट क्र. १०३/१ क्षेत्र ८१ आर. ही मिळकत होय. त्या व्यतीरिक्त मारुती देशमुख याला दुसरे क्षेत्र मिळाले नाही. परंतु, त्याने गट क्र. १०३/२ब/२ब/२ चे ८१आर. क्षेत्र दि.२९/०३/२००५ ला विक्री केले व पुन्हा गट क्र.१०३/१ चे ८१ आर. क्षेत्र दि. २८/०९/२०११ रोजी विक्री केले. अशा परीस्थितीत प्रश्न उदभवतो की, खरा ८१आर. चा कायदेशीर मालक कोण ? वादीतर्फे दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे समजते की, फेरफार क्र.४९४८ नुसार मारुती लक्ष्मण देशमुख याला गट क्र.१०३/३ चे ८१आर. क्षेत्र दिले आहे. परंतु फेरफार क्र. ४९४८ चे बारकाईने निरीक्षण केले असता त्यामध्ये गट नंबर, क्षेत्र व आकार यामध्ये खाडाखोड करुन बदल केलेले दिसते. गट क्र.१०३ चे वाटप झाल्यानंतर शेवटी गट क्र. १०३/२ब/२ब चे विभाजन होवून गट क्र. १०३/२ब/२ब/१/१ व उर्वरित क्षेत्र ०हे. ४आर. याला १०३/२ब/२ असा देण्यात आला असल्याने ते क्षेत्र ८१ आर. कधीही नव्हते असे दिसते. त्यामुळे वादीच्या म्हणण्यात तथ्य आढळून येते. गट नंबरमध्ये बदल करावयाचा झाल्यास तो स्वतंत्र फेरफाराने करायला हवा व त्या संदर्भातील कारणे देखील नोंदविणे आवश्यक आहे. परंतु, त्याबद्दलचा काहीही अधिकृत अभिलेख प्रतिवादी क्र. १ ने सादर केलेला नाही. अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी असे समजते की, गट क्र.१०३/२ब/२ब/२ हा अस्तीत्वात नाही. कोणीतरी हेतूपुर्वक सार्वजनीक दस्तामध्ये बोगस नोंदी केलेल्या आहेत. त्या संदर्भात खरी वस्तुस्थिती समोर येण्यासाठी दोन्ही बाजूंना अधिक पुरावा देणे आवश्यक आहे. या स्थितीला वादीच्या म्हणण्यात तथ्य आढळून येते. दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम

३९(१) नुसार तात्पुरता मनाई हुकूम मंजूर करण्यासाठी वादीला दावा मिळकतीला तबदील होण्याचा धोका दर्शविणे आवश्यक आहे. जर प्रतिवादी त्यामध्ये तबदील अथवा विल्हेवाट लावण्याच्या तयारीत असेल तर त्यामुळे वादीचे नुकसान संभवते. या प्रकरणात वादीचे कथन असे आहे की, गट क्र. १०३/२ब/२ब/२ ही मिळकत अस्तीत्वात नसल्याने त्या संदर्भात असलेले महसूल नोंदीच्या आधारे दावा मिळकत विल्हेवाट करण्याच्या प्रयत्नात आहेत. प्रत्यक्षात वादी हा गट क्र. १०३/१ या मिळकतीच्या मालकी व ताब्यात आहे असे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे त्याच्या मागणीप्रमाणेचा मनाई हुकूम मंजूर न झाल्याने त्याचे न भरुन येणारे नुकसान संभविते. यासर्व कारणांमुळे वादीच्या लाभात प्रथमदर्शनी पुरावा आढळून येत नाही. त्यामुळे न्यायाचा समतोलही वादीच्या लाभात आहे म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देऊन मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने, पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आ दे श

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत प्रतिवादी क्र. १ यांनी वादीच्या दावा मिळकतीतील ताबा व वहिवाटीस हरकत अडथळा करु नये.
3. या दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीची विक्री, हस्तांतर, विल्हेवाट अथवा त्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करु नये.
4. खर्चाचा विचार अंतिम निकालाच्या वेळी केला जाईल.

सही/-

दि. २८/१०/२०२१

( अर्चना श्रीपत नलगे )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment.

a Name of the Stenographer : Shirsikar V.G.
b Court : 2nd Jt. Civil Judge S.D.Pandharpur
c Date of Judgment : 28/10/2021
d Judgment signed by P.O. On: 28/10/2021
e Judgment uploaded on : 28/10/2021